# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

# Maharashtra State Human Rights Commission
## (M S H R C)
## Mumbai

Allotted to Court No. : 1/ ~~2/3~~ १

DOCKET SHEET

*SUO MOTU CASE NO: 4667/13/16/2022*

News item appeared in Marathi Newspaper (MaharashtraTimes) on

18st November,2022 **"सफाई कामगारांच्या वाट्याला कचरा"**,Mumbai.

*Case to :- Hon'ble, Justice K.K Tated, (Retd.).*
*Date of allotment :- 23.11.2022*

SUMMARY

Visit Report after 03/3/23

Closed by Division

Scanned with CamScanner

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई TIMES 4667/13/16/2022
18-11-2022 Page No. 1 and 3

# सफाई कामगारांच्या वाट्याला कचरा

## कांदिवली पालिका कार्यालयाची अवस्था; शौचालय नव्हे उकीरडा, पिण्यासाठी पाणी नाही

म. टा. प्रतिनिधी

- पुरेसा प्रकाशही नाही
- संतापलेल्या कामगारांचे काम बंद आंदोलन

**मुंबई :** घरोघरी जाऊन कचरा गोळा करायचा, रस्ते, नाले, गटारे साफ करून आंघोळीसाठी कार्यालयात यावे तर तिथे हात-पाय धुण्यासोठीही पाणी नाही... जेवणानंतर पिण्याच्या पाण्याची बाटली नळाला लावावी तर नळालाही पाझर फुटत नाही. कार्यालयातील शौचालय म्हणजे उकीरड्यालाही लाज वाटावी अशा स्थितीत. कोणता सफाई कामगार या परिस्थितीत काम करेल? पण हे कामगार पडले कंत्राटी. कधीही नोकरीतून काढता येते, घालूनपाडून बोलता येते, अन्यायाविरूद्ध आवाज उठवला तर दिवस भरला तरी मस्टरवर हजेरी लागेल याची खात्री नाही... कांदिवली येथील पालिकेच्या सफाई कामगार चौकीची ही चित्तरकथा आहे.



कांदिवली पूर्व आणि पश्चिम परिसरातील झोपडपट्ट्या, टॉवर व सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेसाठी पश्चिम येथील एका उड्डाणपुलाखाली मुंबई महापालिकेचे कार्यालय आहे. त्यात कंत्राटी सफाई कामगारांसाठी एक चौकी आहे. ठिकठिकाणी काम केल्यानंतर कामगार या चौकीत जमतात. सुमारे ३००हून अधिक कामगार येथे काम करतात. चौकीत प्रवेश केला तर याला चौकी म्हणावे की अंधार कोठडी असा प्रश्न तुमच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. इतकी बकाल अवस्था. आधीच कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांमधून येणारी दुर्गंधी तर दुसरीकडे चौकीतील अस्वच्छतेने त्यात आणखी भर पडते आहे.

आपले आरोग्य धोक्यात घालून मुंबईकरांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या सफाई कामगारांना या बदल्यात मिळते काय तर, घाणेरडे शौचालय आणि (पान ३ वर)

### आंदोलनानंतर आज बैठकीचे आयोजन

पाणी व शौचालय प्रश्नी गेल्या अनेक दिवसांपासून आम्ही पालिकेच्या अधिकाऱ्यांना माहिती देत आहोत. आंघोळ नसल्याने अंगाला कचऱ्यांची दुर्गंधी येते. त्यामुळे रेल्वे आणि बसमध्ये प्रवासी अवमानकारक वागणूक देतात, अशी खंत कामगारांनी व्यक्त केली. आपल्या मागण्यांसाठी कामगारांनी कचरा वाहतूक श्रमिक संघाच्या नेतृत्वाखाली गुरूवारी सकाळी काम बंद आंदोलन सुरू केले होते. या प्रकरणी लवकरच तोडगा काढला जाईल. या विषयी चर्चा करण्यासाठी आज, शुक्रवारी कांदिवली आर-दक्षिण कार्यालयातील घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे बैठक आयोजित करण्यात आली आहे. या आश्वासनामुळे दुपारी आंदोलन मागे घेण्यात आले, असे रानडे यांनी सांगितले.

## सफाई कामगारांच्या वाट्याला कचरा

(पान १ वरून)

रिकामी व अस्वच्छ पिण्याच्या पाण्याची टाकी. घरोघरी कचरा संकलन करून तो गाडीत टाकणे, रस्ते, पदपथांची निगा ठेवणे यासह विविध प्रकारची कामे सफाई कामगार करतात. कामानंतर कामगार आंघोळीसाठी चौकीत येतात तेव्हा टाकीत पाणीच नसते. कुणाला दिसू नये यासाठी वर एक बॅनर टाकून टाकी झाकून ठेवण्यात आली आहे. अनेक महिने ही टाकी साफ केलेली नाही, अशी माहिती कामगारांनी दिली.

शौचालयाची स्थिती अतिशय भयानक आहे. वर्षांनुवर्ष या शौचालयांना पाणी लागलेले नाही. सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य, वीज नसल्याने अंधार पसरलेला दिसून येतो आहे. कांदिवलीसारखी स्थिती पालिकेच्या अनेक चौक्यांमध्ये आहे. पाणी हा प्रत्येक माणसाचा घटनात्मक अधिकार आहे. पालिका एकीकडे 'मागेल त्याला पाणी' धोरण राबवते तर आपल्याच कामगारांना तो हक्क नाकारते. आंघोळीसाठी नव्हे तर पिण्यासाठीही पाणी मिळत नाही. घाणेरड्या शौचालयात अधिकारी जातील तेव्हा त्यांना वस्तुस्थितीचे भान येईल, असा संताप कचरा वाहतूक श्रमिक संघाचे सरचिटणीस मिलिंद रानडे यांनी व्यक्त केला.

INWARD 0749/CR/2022
RECEIVED ON 23/11/2022
CLERK
REGISTRAR

Scanned with CamScanner

**MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION**

9, Hajarimal Somani Marg, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Terminus , Mumbai – 400 001

Tel : 22092857 Email:- court1-mshrc@mah.gov.in

**KKT/Suo Moto Case No.–4667 /13/16/2022**

| | | |
|---|---|---|
| Name of Respondent | : | The Municipal Commissioner<br>Municipal Corporation of Greater Mumbai<br>Mumbai |
| Date | : | **22nd November 2022** |
| Coram | : | **Justice K.K. Tated, Chairperson** |

# PROCEEDING

Not on board. Taken on board.

2. We noticed news appeared in Marathi news paper Maharashtra Times dated 18.11.2022 on Page 1 and 3 (Mumbai Times) with heading "सफाई कामगारांच्या वाटयाला कचरा; कांदिवली पालिका कार्यालयाची अवस्था; शौचालय नव्हे उकीरडा, पिण्यासाठी पाणी नाही; सफाई कामगारांच्या वाटयाला कचरा"

3. It is stated in the said news that the Municipal Corporation of Greater Mumbai is not maintaining properly the office at Kandivali. There is no provision for drinking water. Not only that even WCs are in bad condition.

4. Considering these facts the following order is passed:

a) Office is directed to issue summons to the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Mumbai Mumbai calling upon them to file their affidavit in reply to the news appeared in Maharashtra Times dated 18.11.2022 on or before 12.12.2022.

D:\CHAIRPERSON 2022\DICTATION\NOV\dictation at home_November.docx Yogita

Scanned with CamScanner

b) Matter to appear on board before Division Bench of Justice K. K. Tated, Chairperson and Shri. Bhagwantrao D. More, Member in Court No.1 on 12th December 2022 at 11.00 a.m.

(Justice K. K. Tated)
Chairperson



Scanned with CamScanner

**MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION**

9, Hajarimal Somani Marg, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Terminus , Mumbai – 400 001

Tel : 22092857 Email:- court1-mshrc@mah.gov.in

## DIVISION BENCH
## Suo Moto Case No.– 4667/13/16/2022

| | | |
|---|---|---|
| Name of Respondent | : | Municipal Commissioner<br>Municipal Corporation of Greater Mumbai<br>Mumbai |
| Date | : | 03rd March **2023** |
| Coram | : | **Justice K.K. Tated, Chairperson**<br>**M.A.Sayeed, Member** |

# ORDER

**(Per: Shri. M. A. Sayeed, Hon'ble Member)**

Marathi local newspaper Maharashtra Times of 18.11.2022 published an Article highlighting on apathy on the part of Municipal Corporation of Greater Mumbai in maintaining its office at Kandivali including basic amenities like drinking water, restrooms etc. A suo motu cognizance was taken by the Commission and summons were issued to the Municipal Commissioner, MCGM. After submission of initial reports at Ex. 'A' & Ex. 'B', some directions were issued by the Commission on 22.11.2022 and 21.12.2022.

2. Finally, this Commission directed Spl. IGP, Investigation Wing attached with the Commission to conduct an independent enquiry to ascertain the status of the progress of the damage control steps taken by the stakeholder department, by primarily focusing on the facts affirmed in para 5 to 10 of the affidavit Ex. 'B'. Accordingly, report Ex. 'C' came to be placed on record by SP, Investigation Wing duly

Scanned with CamScanner

endorsed by I/c. IGP Dr. Ravindra Shisve, contending in para 2 to 7 as under:

"2. मोटर लोडर चौकी अंतर्गत अधिकारी व कामगारांसाठी शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली असून, त्यामध्ये ०१ स्नानगृह, ०४ शौचकुपे व ०३ मुतारी अशी व्यवस्था असल्याचे दिसून आले आहे. स्नानगृहाचे व शौचकूपांचे दरवाजे व कडीकोयंडे सुस्थितीत आहेत. नमूद स्वच्छतागृहामधील शौचकूपांची मलवाहिनी सुस्थितीत बंदीस्त असल्याचे दिसून आले. शौचाकूपांतील मलप्रवाह वाहून नेण्याकरीताची मलवाहिनी दिनांक १९/०९/२०२२ व दिनांक १३/१०/२०२२ रोजी स्वच्छ / साफ करुन घेण्यात आली असल्याचे कागदपत्रांवरून दिसून आले आहे. परंतु ०२ शौचालयांमध्ये कमोडजवळील फरशा तुटलेल्या अवस्थेत दिसून आल्या आहेत. तसेच शौचालयाच्या भिंती थोड्याशा अस्वच्छ असल्याचे दिसून आले आहे. एकंदरीत सदर ठिकाणी स्वच्छता दिसून आली आहे.

३. शौचालयास पाण्याचा पुरवठा सुरळीत व्हावा याकरीता ५०० लिटर क्षमतेच्या०२ टाक्या यसविण्यात आल्या आहेत तसेच शौचालयामध्ये जलजोडणीद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे दिसून आले आहे. सदर ठिकाणी स्वच्छतागृहात योग्य प्रकारे प्रकाशव्यवस्था केली असल्याचे दिसून आले आहे. तसेच शौचालय व चौकी परिसराची दैनंदिन साफसफाई करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे.

४. मोटर लोडर चौकी येथे पिण्यायोग्य पाण्याचा आवश्यक साठा करण्यासाठी झाकण असलेली साठवण टाकी बसविण्यात आली असल्याचे तसेच चौकीमध्ये ०१ वॉटर कुलर (फिल्टरसहीत) बसविण्यात आले असल्याचे दिसून आले आहे. एकंदरीत पाणी व्यव्यस्थेचे योग्य नियोजन केले असल्याचे दिसून आलेले आहे. त्याचप्रमाणे सदर चौकीमध्ये लोकांना थांबण्याकरीता पुरेशी जागा असून पखे रावलेले व ते चालू स्थितीत असल्याचे दिसून आले आहे.

५. सदर भेटीदरम्यान मोटर लोडर चौकी येथे हजर असलेल्या अधिकारी / कर्मचारी सूपरवायझर श्री. विनोद सोघम, चौकी मुकादम श्री. अमूल कन्यूभाय सोलंकी व श्री. मंगेश गोपाल यादव, सफाई कामगार श्रीमती दिपाली मुकेश बारीया व इतर कंत्राटी कामगार यांच्याकडे चौकीच्या स्वच्छतेबाबत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर श्रीकीमध्ये स्वच्छता तसेच इतर भौतिक सुविधा असून, कामगारांनी समाधान व्यक्त केलेले आहे.

६. तसेच मोटर लोडर चौकीच्या बाजूलाच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय सुध्दा आहे. त्याची स्वच्छता व व्यवस्था देखील योग्य प्रकारे राखली असल्याचे दिसून आले आहे.

७. अन्वेषण विभागाने दिनांक २०/०२ / २०२३ रोजी दिलेल्या अचानक भेटीदरम्यान य केलेल्या पाहणीमध्ये, मोटर लोडर चौकी, कांदीवली येथे स्वच्छता व इतर व्यवस्था योग्य प्रकारे असल्याचे दिसून आलेले आहे. ८. भेटीदरम्यान फोटो काढण्यात आलेले असून, ते सोबत जोडण्यात आलेले आहेत."

3. Thus, with such report on record, corroborating the justification placed on record by the respondent vide affidavits Ex. 'A' & Ex. 'B', we

Scanned with CamScanner

are of the opinion that further intervention in the matter is not warranted. Accordingly following order:

**"ORDER"**

a) Present suo motu case stands closed and disposed off.

**(M.A. Sayeed)**
**Member**

**(Justice K. K. Tated)**
**Chairperson**

Scanned with CamScanner